# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०१.०५.२०२६ शुक्रवार**

**नागपूर शहर आयुक्तालय अंतर्गत महाराष्ट्र दिन साजरा :–**

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर डॉ. श्री. रविंद्रकुमार सिंगल यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ०१.०५.२०२६ चे ०७.०० वा. पोलीस भवन, सिव्हील लाईन, नागपुर येथे ६७ वा महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले तसेच, महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधुन, मा. पोलीस महासंचालक सन्मान चिन्हाचे वितरण करण्यात आले. नागपुर शहर पोलीस दल तथा नागपुर ग्रामीण पोलीस दलातील एकुण ४५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी उपस्थित सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देवुन, पदकप्राप्त मानकरी यांचे अभिनंदन करून, पोलीस दलातील पुढील वाटचालीस मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी मा. सह पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, श्री. शिवाजीराव राठोड, श्री. राजेंद्र दाभाडे, सर्व मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. १ ते ६), सर्व मा. सहायक पोलीस आयुक्त, सर्व मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच, अधिकारी व अंमलदार त्याचप्रमाणे आमंत्रित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.









**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३०.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १४ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण १,७४,९९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून एकुण ३,७७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३८६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१७,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाठोडा:— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २९.०४.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक ३०..०४.२०२६ चे ०२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. ४८, टिचर कॉलोनी, कृष्णानगरी, बहादुरा नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती रिना लालबहादुर विश्वकर्मा, वय २६ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन मैत्रिणीकडे मनिष नगर येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख २,७०,०००/—रू., तसेच सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,६६,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. जाहीद मोमिन ८४८४९१२१९१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपिलनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०४.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे योगेश गजानन कावळे वय ३८ वर्षे रा. प्लॉट नं. २०, कामना नगर, कळमना, नागपूर हे पोलीस ठाणे हद्दीतील ऑटोमोटीव्ह चौक कामठी रोड येथून पायदळ जात असतांना टेकानाका चौकाकडून कामठी रोडकडे जाणारी स्टार सिटी बस क्र. एमएच ४० बीएल ३८४१ चा चालक देवानंद राममिलन खैसी वय ४९ वर्षे रा. प्लॉट नं. १४३, चिंतामणी नगर, कळमना, नागपुर याने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन इलेक्ट्रीक गाडी क्र. एमएच ४९ बीएक्स ८४५९ ला धडक देवून गाडी समोरून पायी जाणाऱ्या फिर्यादीचे भावास धडक देवुन, त्यास फरफटत नेल्याने फिर्यादीचा भाऊ गंभीर झाला. त्यास उपचाराकरीता होप हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी मंगेश गजानन कावळे वय ४२ वर्षे रा. ३८ वर्षे रा. प्लॉट नं. २०, कामना नगर, कळमना, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे बस चालकाविरूध्द कलम १०६, २८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कळमना :— घातक शस्त्र बाळगून धुमाकूळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३०.०४.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, कळमना पोलीसांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत कळमना गाव, आजरी—माजरी रोडवर, फागु पानठेल्याजवळ एक इसम हातात मोठ्या आकाराचा लोखंडी चाकू घेवून येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना मारण्याची धमकी देवून चाकु भिरकावून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक इसम हातात लोखंडी चाकू घेवून भिरकावतांना दिसून आला. कळमना पोलीसांनी त्यास शस्त्र टाकून देण्याबाबत सांगितले असता, त्याने पोलीसांवर चाकु भिरकाविल्याने पोलीसांनी योग्य बळाचा वापर करून त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मुश्ताक खान रहिम खान, वय २३ वर्षे, रा. बाबा ताज कॉलोनी, प्लॉट नं. १०४, आजरी—माजरी रोड, कळमना, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लांब लोखंडी चाकु किंमती अंदाजे ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमना येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** गजानन सखाराम कटकमवार, वय ७७ वर्षे, रा. गुरूकुंज नगर प्जॉट नं. १४०, चिखली रोड, मानेवाडा, नागपूर हे दिनांक २२.०४.२०२६ चे १७.३० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील उदय नगर चौकातील सलूनचे दुकानातून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे—पांढरे, अंगात— ग्रे रंगाची टी—शर्ट व निळ्या रंगाचा नाईट पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी बोलतात.



गजानन

स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.